महाराष्ट्र शासन

# एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय,

महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई

(महिला व बाल विकास विभाग)

कार्यालयाचा पत्ता :- रायगड भवन, रिअर विंग, पहिला मजला, सी.बी.डी. बेलापूर- ४०० ६१४

Email- comicdsraigadbhavan@gmail.com दुरध्वनी क्र.-०२२-२७५७६३८८,३२२,३२३ Fax-०२२-२७५७६३२४

जा.क्र. एबाविसेयो/का-७/सक्षम अंगणवाडी साहित्य/२०२५/ 437 नवी मुंबई दिनांक- /०१/२०२५

28 JAN 2025

## पुरवठा आदेश

**विषय :- सक्षम अंगणवाडी योजनेअंतर्गत केंद्र शासनाने निश्चित केलेल्या सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात ५९५ अंगणवाडी केंद्र व सन २०२४-२५ या आर्थीक वर्षात १३००६ अंगणवाडी केंद्र असे एकुण राज्यातील १३५९५ अंगणवाडी केंद्रापैकी ६७९७ अंगणवाडी केंद्रांना "सक्षम अंगणवाडी साहित्याचा" पुरवठा करणेबाबत..**

संदर्भ :- १) शासन पत्र क्र. एबावि-२०२४/प्र.क्र.१४८/का-६ दि. ११/१०/२०२४

२) या कार्यालयाचे पत्र क्र.एबाविसेयो/का-७/सक्षम अंगणवाडी /२०२४/६४३९ दि.२१/११/२०२४

३) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. एबावि-२०२४/प्र.क्र. १४८/का-६ दि. १०/०१/२०२५

केंद्र शासनाने Upgradation of AWCs to Saksham Anganwadi या योजनेंतर्गत निश्चित करुन दिलेले विविध साहित्य जसे पोषण वाटिका, रेन वॉटर हार्वेस्टींग, RO युनिट, LED TV, इतर इन्फ्रास्ट्रक्चर आस्थापित करुन अंगणवाडी केंद्रांचे अपग्रेडेशन करण्याची योजना कार्यान्वित केलेली आहे.

त्याअनुषंगाने केंद्र शासनाने सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात ५८९ व सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात १३००६ याप्रमाणे राज्यातील एकुण १३५९५ अंगणवाडी केंद्रांमध्ये पोषण वाटिका, रेन वॉटर हार्वेस्टींग, RO युनिट, LED TV, इतर इन्फ्रास्ट्रक्चर इ. साहित्य उपलब्ध करुन देणेसाठी मान्यता दिलेली आहे. सदर मान्यतेच्या अधीन राहून शासनाने संदर्भ क्र. १ च्या पत्रान्वये सक्षम अंगणवाडी योजनेंतर्गत राज्यातील १३५९५ अंगणवाडी केंद्रांचे सक्षम अंगणवाडीमध्ये श्रेणीवर्धन करण्याकरिता साहित्य उपलब्ध करुन देणेसाठी निविदा प्रकाशित करण्यास व निविदा मसूद्यास (अटी शर्तीसह) मान्यता दिली होती. त्याअनुसार या कार्यालयामार्फत दि. ११/१०/२०२४ रोजी महाटेंडर संकेतस्थळावर ई-निविदा प्रकाशित करण्यात आली होती. सदर निविदा प्रक्रियेअंती L१ निविदाधारक व सक्षम अंगणवाडी साहित्यासाठी प्रति संच रु ९४९४४/- या L१ दरानुसार साहित्याचा पुरवठा करणेस मान्यता मिळणेसाठीचा प्रस्ताव संदर्भ क्र. २ अन्वये शासनास सादर करण्यात आला होता.

त्याअनुषंगाने शासनाने संदर्भ क्र. ३ येथील दि. १०/०१/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सक्षम अंगणवाडी योजनेअंतर्गत राज्यातील १३५९५ अंगणवाडी केंद्रांच्या सक्षमीकरणाकरिता खालीलप्रमाणे एकुण **रुपये १२९,०७,६३,६८०/- (रुपये एकशे एकोणतीस कोटी सात लाख त्रेसष्ठ हजार सहाशे ऐंशी फक्त) (सर्व करासहित)** एवढया रक्कमेचे सक्षम अंगणवाडी साहित्य L१ निविदाधारकांकडून खरेदी करण्यास व त्यासाठी येणाऱ्या खर्चास शासनाने मान्यता दिलेली आहे.

| अ. क्र. | L१ निविदा-धारकाचे नांव | साहित्याचे नांव | प्रकल्पाचा प्रकार | खरेदी करावयाच्या सक्षम अंगणवाडी साहित्याची एकुण संख्या | प्रति संच किंमत रुपये (सर्व करासहित) | एकुण खरेदीची किंमत रुपये (सर्व करासहित) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मे. रेवती एन्टरप्रायझेस,पुणे | **सक्षम अंगणवाडी साहित्य** | ग्रामीण/ आदिवासी प्रकल्प | ६७९८ | ९४९४४ | ६४५४२९३१२ |
| २ | मे. रुद्र एन्टरप्रायझेस,पुणे | | | ६७९७ | ९४९४४ | ६४५३३४३६८ |
| | **एकुण** | | | **१३५९५** | **९४९४४** | **१२९०७६३६८०** |

**रु. १२९,०७,६३,६८०/-(अक्षरी रुपये एकशे एकोणतीस कोटी सात लाख त्रेसष्ठ हजार सहाशे ऐंशी फक्त)**

**दि. १०/०१/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासनाने दिलेल्या मान्यतेच्या अधीन राहून सन २०२३-२४ या आर्थीक वर्षात केंद्र शासनाने मंजुरी दिलेल्या ५८९ अंगणवाडी केंद्रांपैकी या कार्यादेशान्वये तक्ता "अ" मध्ये नमुद २९४ अंगणवाडी केंद्र आणि सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात केंद्र शासनाने मंजुरी दिलेल्या १३००६ अंगणवाडी केंद्रांपैकी या कार्यादेशान्वये तक्ता "ब" मध्ये नमुद ६५०३ अंगणवाडी केंद्र असे एकुण ६७९७ अंगणवाडी केंद्राना प्रति संच रुपये ९४९४४/- या दराने एकुण रुपये ६४,५३,३४,३६८/- (अक्षरी रुपये चौसष्ठ कोटी त्रेपन्न लाख चौतीस हजार तीनशे अडुसष्ठ फक्त) (सर्व करासहित) एवढया रक्कमेचा सोबत जोडलेल्या विवरणपत्रातील अंगणवाडी केंद्रांचे सक्षमीकरण करणेकरिता मे. रुद्र एन्टरप्रायझेस,पुणे या पुरवठाधारकास आदेशात नमुद अटी व शर्तीच्या अधीन राहून सक्षम अंगणवाडी साहित्याचा पुरवठा करणे व आस्थापित करण्यास आदेशीत करण्यात येत आहे.**

सोबतच्या विवरणपत्रातील प्रत्येक अंगणवाडी केंद्राला द्यावयाचे **"सक्षम अंगणवाडी साहित्य"** मध्ये विविध प्रकारच्या साहित्याचा समावेश करण्यात आलेला आहे, त्याचा तपशील निविदेत नमुद केल्यानुसार खालीलप्रमाणे.

1) **LED TV:- प्रति अंगणवाडीस 1 नग**

1) **43 inch LED TV - 1 No.**
2) **E- Learning Pen Drive** - Accredited Digital Education Content as per New National Education Policy (For 3 to 6 Year old) – 1 No.

43 inch LED TV Full HD 1920 x 1080 Android TV with an appropriate inverter and USB Port for E-Learning Pen Drive is to be installed. This Pen Drive is to be pre-loaded with basic e-learning modules and topics like Alphabets, Numbers, Body Parts, Colors, Shapes, Vehicles, Professions, Days & Months of the Year, Festivals, Seasons, Good Habits etc., to enable the children to understand and learn the bare educational basics. It is also required to have the nursery rhymes and traditional local folklore songs. The proposed software content would be approved by the department ( SCERT)

2) **RO Unit** (RO+UV+UF+Alkaline) **:- प्रति अंगणवाडीस 1 नग**

Semi-Automatic with External Cut Auto off ,

Filtration Capacity- 10 Ltrs,

ISO 9001, ISO 14001, ISO 18001, ISO 13485, Certificate of Compliance, ROHS

3) **Poshan Vatika :- प्रति अंगणवाडीस 1 संच (5 साहित्यांचा एक संच)**

| अ. क्र | साहित्याचे तपशील | **प्रति संच नग संख्या** |
|---|---|---|
| 1 | **Metal Grape Hoe ( फावडे ) with Wooden Handle** | 01 |
| 2 | **Metal Sickle ( खुरपे ) With Wooden Handle** | 01 |
| 3 | **Metal Shovel ( टिकाव ) with Woden Handle for Agriculture Farming** | 01 |
| 4 | **Plastic Tub ( घमेले )** | 01 |
| 5 | **Garden Watering Can (5L)** | 01 |

4) **Rain Water Harvesting :- प्रति अंगणवाडीस 1 संच (6 साहित्यांचा एक संच)**

| अ. क्र | साहित्याचे तपशील | **प्रति संच नग संख्या** |
|---|---|---|
| 1 | **PVC Half Round Pipe ( पन्हाळी )**- Item Dimensions: maximum 10ft lenth , half round diameter of 100 mm pipe | 1 |
| 2 | **PVC Round Pipe :-** Item Dimensions: maximum 10ft lenth ,pipe Round 100 mm pipe | 1 |
| 3 | **Rain water harvester filter :** | 1 |
| 4 | **Plastic Storage Tank :-** (300 Litre) | 1 |
| 5 | **Storage tank Metal stand :** Item Dimensions: 600 mm x 600 mm | 1 |
| 6 | **Hardware and fitting Accessory:** All accessory and hardware required for fitting of PVC Half Round Pipe (Panali) useful for rain water harvesting system . | 1 set |
| **उपरोक्त साहित्याची जोडणी व उभारणी प्रत्यक्ष अंगणवाडी स्तरावर जाऊन करावी.** | | |

## 5) Other Infrastructure :- प्रति अंगणवाडीस 1 संच (32 साहित्यांचा एक संच)

| अ. क्र | साहित्याचे तपशील | प्रति संच नग संख्या |
|---|---|---|
| 1. | **Slide** | 1 |
| 2. | **Dustbin** | 1 |
| 3. | **Giraffe /Horse/elephant rocker** | 2 |
| 4. | **Green Chalk Board** | 1 |
| 5. | **Doormat** | 1 |
| 6. | **Activity book (Each set containing of 10 numbers of activity books)** | 1 |
| 7. | **Skipping Ropes** | 1 |
| 8. | **Tennikot Ring** | 1 |
| 9. | **Flying Disc** | 1 |
| 10. | **Ground Marking Cone** | 1 |
| 11. | **Throw Ball** | 1 |
| 12. | **Drawing Set** | 1 |
| 13. | **Building Blocks** | 1 |
| 14. | **Counting Frame** | 1 |
| 15. | **Puzzle Animal** | 1 |
| 16. | **Active Block Set** | 1 |
| 17. | **Lacing Board** | 1 |
| 18. | **Puppet doll** | 1 |
| 19. | **Jod Tod Khelni** | 1 |
| 20. | **Toy Game Cartoon Set** | 1 |
| 21. | **Multiple Colours And Shape-Set of 3-** | 1 |
| 22. | **Toy Game Learning Watch** | 1 |
| 23. | **Multi Layer Activity Board** | 1 |
| 24. | **Tan Gram Puzzle** | 1 |
| 25. | **Wooden Pyramid Set** | 1 |
| 26. | **Hulla Hoop** | 1 |
| 27. | **Marathi Number 1 To 10 Set** | 1 |
| 28. | **Hand Block Set** | 1 |
| 29. | **Week Day Train** | 1 |
| 30. | **Colourful Beads And Shoe Lace** | 1 |
| 31. | **Pre-Primary Activity Material** | 1 |
| 32. | **Modelling Materials** | 1 |

**सक्षम अंगणवाडी साहित्याचा पुरवठा खालील अटी शर्तीनुसार करणे बंधनकारक राहील.**

१. सक्षम अंगणवाडी साहित्यासाठी प्रकाशित ई-निविदेतील सर्व अटी शर्ती तसेच संदर्भ क्र. २ येथील दि.१०/१/२०२५ रोजीच्या शासन निर्णयात नमुद सर्व अटी शर्तीनुसार पुरवठा करणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहतील.

२. **सक्षम अंगणवाडी साहित्याचा** पुरवठा करतांना ई-निविदेत व Corrigendum मध्ये नमुद Specification नुसारच अंगणवाडी स्तरावर पुरवठा करणे बंधनकारक राहील.

३. **सोबत जोडलेल्या तक्ता "अ" मधील सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील ५८९ अंगणवाडी केंद्रांपैकी २९४ अंगणवाडी केंद्रांमध्ये** निविदेतील अटी शर्तीनुसार **"सक्षम अंगणवाडी साहित्य"** पुरवठा करणे, आस्थापित करणे इ. सर्व कामकाज अंगणवाडीस्तरावर **दि. ३१ मार्च-२०२५ पुर्वी प्राधान्यक्रमाने पुर्ण** करण्यात यावे.

४. **सोबत जोडलेल्या तक्ता "ब" मधील सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील १३००६ अंगणवाडी केंद्रांपैकी ६५०३ अंगणवाडी केंद्रांमध्ये** निविदेतील अटी शर्तीनुसार **"सक्षम अंगणवाडी साहित्य"** पुरवठा करणे, आस्थापित करणे इ. सर्व कामकाज अंगणवाडीस्तरावर, निविदेत नमुद केल्याप्रमाणे १८० दिवसांच्या आत म्हणजेच **दि. २२/०७/२०२५ पुर्वी** पुर्ण करणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील.

५. अंगणवाडी केंद्रांचे सक्षम अंगणवाडीमध्ये श्रेणीवर्धन करण्याकरिता अंगणवाडी केंद्रांची निवड केंद्र शासनामार्फत करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील २९४ आणि सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील ६५०३ असे एकुण ६७९७ अंगणवाडी केंद्राची यादी या कार्यादेशासोबत जोडण्यात येत आहे. त्यानुसार जिल्हयातील संबधित प्रकल्पांतील अंगणवाडी केंद्र संख्येनुसार **"सक्षम अंगणवाडी साहित्य"** पुरवठा करणे, आस्थापित करणे, पुरवठाधारकावर बंधनकारक राहील.

६. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि. १ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयातील खरेदी धोरणातील तरतुदीचे तसेच वेळोवेळी शासनस्तरावरुन निर्गमित आदेशाचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

७. संबधित पुरवठाधारकाने निविदेसोबत **"सक्षम अंगणवाडी साहित्याचा** जो नमुना सादर केलेला आहे त्याच साहित्याचा पुरवठा, अंगणवाडी स्तरावर करणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील.

८. अंगणवाडी केंद्राचे सक्षमीकरण करणेसाठी उपरोक्त साहित्य क्र ०४ मध्ये दर्शविलेल्या Rain Water Harvesting साहित्याची जोडणी व उभारणी निविदेत नमूद Specification नुसार प्रत्यक्षात अंगणवाडी स्तरावर जाऊन करणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. बांधीव छताच्या ठिकाणी नमूद साहित्य व्यतिरिक्त इतर साहित्य आवश्यक असल्यास पुरवठाधारकाने त्याचे नियोजन करून काम पूर्णत्व करावे.

९. पुरवठा आदेश प्राप्त झाल्यानंतर ५०० रुपयांचे स्टॅम्प पेपरवर ७ दिवसाच्या आत करारनामा करणे बंधनकारक राहील.

१०. **अनामत रक्कम :-** निविदेत नमुद अटी शर्तीनुसार निविदा धारक राष्ट्रीय लघु उद्योग महामंडळाकडे (NSIC) आणि मायक्रो स्मॉल आणि मिडियम इंटरप्राईजेस डेव्हलपमेंट (MSMEDIS ) यांच्याकडे नोंदवलेले सूक्ष्म आणि लघु उद्योजक घटक असल्यास सुरक्षा ठेव रक्कमेबाबत महाराष्ट्र शासन उद्योग व

कामगार विभागाकडील शासन निर्णय दिनांक १/१२/२०१६ मधील मुद्दा क्रमांक ४.६ (अनामत रक्कम) मध्ये नमुद केल्याप्रमाणे अवलंब करण्यात येईल.

११. दि. १०/०१/२०२४ रोजीच्या शासन निर्णयातील अट क्र. २ मध्ये नमुद केल्याप्रमाणे उपरोक्त नमुद दर पुढील ३ वर्ष कालावधीसाठी (२०२५-२६, २०२६-२७ व २०२७-२८) लागू राहतील. त्यानुसार L१ निविदाधाराकडून केंद्र शासनाकडून मंजुर निधीच्या मर्यादेत सक्षम अंगणवाडी साहित्य किट खरेदी करण्याकरिता दरवर्षी शासनाकडून प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.

१२. निविदेतील अटी शर्तीनुसार सदरच्या साहित्य पुरवठयाचे आदेश प्राप्त झाल्यापासुन आदेशात नमुद केल्यानुसार **"सक्षम अंगणवाडी साहित्य"** अंतर्गत संपुर्ण कामकाज दि. ३१ मार्च, २०२५ पुर्वी प्राधान्यक्रमाने करणे आवश्यक आहे. तसेच विशिष्ट परिस्थितीत म्हणजेच कोवीड सारखी संसर्गजन्य रोगाची परिस्थिती, वाहतुकीचा संप, भुकंप, ज्वालामुखी, अतिवृष्टी इ. आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास पुरवठा कालावधीत वाढ करण्याचे (मुदतवाढ) अधिकार आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय, रायगड भवन, बेलापुर, नवी मुंबई यांना राहतील.

१३. सदर पुरवठा करतांना प्रत्येक साहित्यावर **"एबाविसेयो अंतर्गत वापरासाठी/शासनामार्फत पुरवठा"** असा शिक्का किंवा लेबल लावणे बंधनकारक आहे.

१४. **"सक्षम अंगणवाडी साहित्य"** मधील वस्तु खराब अथवा नादुरुस्त असल्यास तसेच साहित्याच्या दर्जाबाबत काही तक्रार असल्यास १५ कार्यालयीन दिवसात बदलून देणे संबधित पुरवठाधारकावर बंधनकारक राहील.

१५. ई-निविदेत नमुद तसेच Corrigendum मध्ये नमुद केल्याप्रमाणे वॉरन्टी आणि दुरुस्तीची विनाशुल्क सेवा पुरविणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील.

१६. **सक्षम अंगणवाडी साहित्याच्या** वाटपामध्ये अनियमितता झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी पुरवठाधारकावर राहील.

१७. निविदेत नमुद पुरवठा कालावधीमध्ये **सक्षम अंगणवाडी साहित्याचा** पुरवठा न झाल्यास विलंबाने पुरवठा झालेल्या मालाच्या किंमतीवर ०.५% प्रती आठवडा प्रमाणे दंड आकारला जाईल व त्याची कमाल मर्यादा खालील प्रमाणे-

अ) पुरवठा कालावधीमध्ये पुरवठा न केलेल्या साहित्याची किंमत दोन लाखा पेक्षा कमी असेल तर अशा साहित्याच्या किंमतीच्या १० % दंड .

ब) पुरवठा कालावधीमध्ये पुरवठा न केलेल्या मालाची किंमत दोन लाखापेक्षा जास्त असेल तर अशा किंमतीच्या ५% दंड,

१८. या कार्यालयामार्फत क्षेत्रीय स्तरावरुन अचानकपणे सदर साहित्याचा नमुना घेऊन उद्योग ऊर्जा व कामगार विभागाच्या दि. १/१२/२०१६ रोजीच्या खरेदी धोरणातील ६.१२ परिशिष्ट-१२ मध्ये नमुद प्रयोगशाळेकडे तपासणी करिता (Specification प्रमाणे आहे किंवा कसे) पाठविण्यात येईल. याबाबतचे प्रयोशाळेमार्फत प्राप्त देयकाची रक्कम पुरवठाधारकाने अदा करणे बंधनकारक राहील. तसेच प्रयोगशाळेच्या अहवालानुसार Specification मध्ये विसंगती दिसून आल्यास सदर साहित्याची संपुर्ण

बॅच तात्काळ विहित मुदतीत बदलून देणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. यासाठी कोणताही अतिरिक्त खर्च झाल्यास तो या कार्यालयामार्फत अदा करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

१९. निविदेतील अटी शर्तीनुसार **"सक्षम अंगणवाडी साहित्य"** पुरवठया संदर्भातील देयकांची अदायगी खालील कार्यपध्दतीनुसार करण्यात येईल.

i. पुरवठाधारकाने **"सक्षम अंगणवाडी साहित्य"** मधील LED TV, RO Water Purifier, पोषण वाटिका साहित्य, इतर इन्फ्रास्ट्रक्चर साहित्याचा पुरवठा अंगणवाडी स्तरावर पोहोच केल्यानंतर त्याची पोहोच पावती संबधित प्रकल्प अधिकारी कार्यालय येथे एक प्रत जमा करून त्या प्रकल्पात असणाऱ्या सर्व अंगणवाडी केंद्राची एकच पोहोच तयार करून त्या पावतीवर प्रकल्प अधिकारी अथवा प्रकल्प कार्यालयातील अधिकृत कर्मचारी यांची स्वाक्षरी व शिक्का तसेच जडवस्तु संग्रह नोंदवहीमध्ये नोंद घेऊन आयुक्त एकात्मिक बाल विकास सेवा योजना कार्यालयाला जमा करावी. तदनंतर आयुक्त कार्यालयामार्फत सदर साहित्याचा एक नमुना राज्यातील कोणत्याही एका अंगणवाडी स्तरावरुन ताब्यात घेऊन व सीलबंद करून उदयोग, उर्जा व कामगार विभाग यांचे दिनांक ०१ डिसेंबर २०१६ मध्ये नमुद केलेल्या अधिकृत प्रयोग शाळेतुन तपासणी करुन घेण्यात येईल. साहित्य (LED TV, RO Water Purifier, पोषण वाटिका, इतर इन्फ्रास्ट्रक्चर) नमुन्याप्रमाणे व वर्णनाप्रमाणे असल्याचा अहवाल प्राप्त झाल्या नंतरच देयकाची रक्कम अदायगी करण्यात येईल. या तपासणीसाठीचा संपूर्ण खर्च पुरवठाधारकांना करणे बंधनकारक राहील.

ii. तसेच पुरवठाधारकाने रेन वॉटर हार्वेस्टिंग साहित्याचा पुरवठा अंगणवाडी स्तरावर पोहोच केल्यानंतर त्याची पोहोच पावती संबधित प्रकल्प अधिकारी कार्यालय येथे एक प्रत जमा करून त्या प्रकल्पात असणाऱ्या सर्व अंगणवाडीच्या एकच पोहोच तयार करून त्या पावतीवर प्रकल्प अधिकारी अथवा प्रकल्प कार्यालयातील अधिकृत कर्मचारी यांची स्वाक्षरी व शिक्का घेऊन आयुक्त एकात्मिक बाल विकास सेवा योजना कार्यालयाला जमा करावी तदनंतर आयुक्त कार्यालयामार्फत सदर साहित्याचा एक नमुना राज्यातील कोणत्याही एका अंगणवाडी स्तरावरुन ताब्यात घेऊन व सीलबंद करून उदयोग, उर्जा व कामगार विभाग यांचे दिनांक ०१ डिसेंबर २०१६ मध्ये नमुद केलेल्या अधिकृत कोणत्याही एका प्रयोग शाळेतुन तपासणी करुन घेण्यात येईल. रेन वॉटर हार्वेस्टिंग साहित्य नमुन्याप्रमाणे व वर्णनाप्रमाणे असल्याचा अहवाल प्राप्त झाल्या नंतरच देयकाची ५० % रक्कम अदायगी करण्यात येईल. पुरवठाधारकाने निविदेत नमुद केल्याप्रमाणे काम पुर्ण केल्यानंतर, जिल्हा कार्यक्रम अधिकारी यांनी व्यक्तीश: किमान जिल्हयातील ५% अंगणवाडीतील कामाचे प्रत्यक्ष तपासणी करुन जिल्हयातील अंगणवाडी केंद्राचे काम निविदेतील अटी शर्ती प्रमाणे पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच पुरवठाधारकाचे उर्वरित राहिलेले ५०% साहित्य पुरवठयाचे देयक अदा करण्यात येईल.

२०. संबधित जिल्हयातील सर्व प्रकल्पांत **"सक्षम अंगणवाडी साहित्य"** पुरवठा झाल्यानंतर निविदेत नमुद केलेल्या अटी शर्तीनुसार वस्तुनिहाय GST ची परिगणना करुन LED TV, RO Water Purifier, पोषण वाटिका, इतर इन्फ्रास्ट्रक्चर साहित्य पुरवठयाचे जिल्हयातील सर्व प्रकल्पांचे एकच Tax Invoice एकुण ३ प्रतीत सादर करावीत. तसेच रेन वॉटर हार्वेस्टिंग साहित्य पुरवठयाचे जिल्हयातील सर्व

प्रकल्पांचे एकच Tax Invoice एकुण ६ प्रतीत सादर करावीत. जिल्हानिहाय प्राप्त झालेल्या देयकांची अदायगीची कार्यवाही निविदेत नमुद कार्यपध्दतीनुसार करण्यात येईल.

उपरोक्त नमुद अटी शर्तीनुसार विहित कालावधीत सुस्थितीत सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील **तक्ता "अ"** मध्ये नमुद २९४ अंगणवाडी केंद्रांमध्ये **सक्षम अंगणवाडी साहित्याचा** पुरवठा व साहित्य आस्थापित करणेची कार्यवाही दि. ३१/०३/२०२५ पुर्वी प्राधान्याने अंगणवाडी स्तरावर करण्यात यावे. तसेच सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील **तक्ता "ब"** मध्ये नमुद ६५०३ अंगणवाडी केंद्रांमध्ये **सक्षम अंगणवाडी साहित्याचा** पुरवठा व साहित्य आस्थापित करणेची कार्यवाही निविदेत नमुद केल्याप्रमाणे १८० दिवसाच्या आत म्हणजेच दि. २२/०७/२०२५ पुर्वी अंगणवाडी स्तरावर करणे बंधनकारक राहील.

सोबत:- **"सक्षम अंगणवाडी साहित्य"**

पुरवठा करावयाच्या अंगणवाडी केंद्रांचे

जिल्हानिहाय विवरणपत्र तक्ता अ व तक्ता ब

**(कैलास पगारे, भाप्रसे)**
आयुक्त,
एकात्मिक बाल विकास सेवा योजना,
महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई

प्रति,

मे. रुद्र एन्टरप्रायझेस,
अ.क्र. ५६/३/६१, शॉप नं. ५, एम के अपार्टमेंट,
कवडे नगर, लेन नं. ३, पिंपळे गुरव,पुणे- ४११०६१

प्रतिलिपी,

१) मा. सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सविनय सादर,
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद-----------------(सर्व) यांनामाहितीसाठी
३) जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे
४) अप्पर कोषागार अधिकारी, कोकणभवन, बेलापूर, नवी मुंबई यांना माहिती तथा उचित कार्यवाहीसाठी
५) सहा. संचालक (वित्त व लेखा), एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांना उचित कार्यवाहीसाठी
६) संबधित जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबावि)- यांनी सदरचे आदेश सर्व ग्रामीण/आदिवासी प्रकल्पांना आपल्या स्तरावरुन पाठविण्यात यावेत. तसेच या योजनेवर संनियंत्रण ठेवणेत यावे.
७) संबधित बाल विकास प्रकल्प अधिकारी- (नागरी) व (ग्रामीण / आदिवासी) यांनी सोबत जोडलेल्या अंगणवाडीनिहाय यादीमध्ये आपल्या प्रकल्पांतील ज्या अंगणवाडी केंद्राचे सक्षमीकरण करावयाचे आहे, त्याचे नाव व पत्ता देण्यात आलेला आहे, सदर अंगणवाडी केंद्रामध्ये सक्षम अंगणवाडी साहित्य किट मधील सर्व साहित्याची अंगणवाडी स्तरावर पुरवठा झाल्याची खात्री करुन साहित्य सुस्थितीत प्राप्त झाल्याबाबत प्रमाणित करण्यात यावे. तसेच सदर अंगणवाडी केंद्रामध्ये रेन वॉटर हार्वेस्टींगचे कामकाज करुन घेण्याची जबाबदारी संबधित अधिकाऱ्याची राहील.